# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
## कृषि नगर वसमत रोड,परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| Tel. & Fax No.(02452)229755 | Web:http:www.vnmkv.ac.in | E-mail: /reg_mau@rediffmail.com reg@mkv.ac.in |
|---|---|---|


वाचाः महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१६/प्र.क्र.१८३/१८(र.व का) दि.२३.६.२०१७

जा.क्र. आस्था-५/२०२१ 13833
दिनांक 12 /१०/२०२१

**सेवानिवृत्त विद्यापीठ कर्मचारी यांना ओळखपत्र देणे बाबत**

परिपत्रक

प्रकरणी विद्यापीठा अंतर्गत सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी उक्त शासन परिपत्रकानुसार थेट या कार्यालयाकडे अर्ज करुन ओळखपत्र देण्याची मागणी करीत आहेत, याकरीता मोठया प्रमाणात अर्ज प्राप्त होत आहेत, अशा अर्जावरुन संबंधित सेवा निवृत्त कर्मचारी यांना ओळखपत्र निर्गमित करण्यात तांत्रिक अडचणी उद्भवत आहेत याकरीता स्पष्ट निर्देश देण्याची बाब विद्यापीठ प्रशासनाच्या विचाराधीन होती.

विद्यापीठाच्या सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना ओळखपत्राची मागणी करावयाची असल्यास प्रथम त्यांनी खालील/सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये ओळखपत्र तयार करावे, ओळखपत्रासोबत संपुर्ण माहीती भरुन ते ज्या कार्यालयातून सेवा निवृत्त झाले आहेत त्या कार्यालयाकडे सादर करावे. त्यानंतर सबंधित कार्यालय प्रमुखांनी ओळखपत्रातील माहीतीची पडताळणी करुन सदर कर्मचारी हे या कार्यालयाच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झाले असुन त्यांनी नमुद केलेली माहीती बरोबर आहे असे कार्यालयाच्या आवरण पत्रावर (covering letter) प्रमाणीत/नमुद करुन सदर ओळखपत्र या कार्यालयाकडे अग्रेषीत करावे. तसेच ओळखपत्र मागणी करणारे कर्मचारी हे अंशदायी निवृत्त वेतनधारक असतील अशा कर्मचा-यांचा DCPS/NPS क्रमांक व भविष्य निर्वाह निधी धारक असतील तर UEPF क्रमांक ओळखपत्रावर नमुद करावा.

सोबत- ओळखपत्राचा नमुना.

डॉ.धिरजकुमार रा.कदम
कुलसचिव

ओळखपत्राचा नमुना.

| महाराष्ट्र शासन<br>सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे ओळखपत्र | महाराष्ट्र शासन |
|---|---|
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी |
| ओळखपत्र क्रमांक :<br>फोटो<br>नांव :<br>सेवानिवृत्तीवेळी<br>धारण केलेले पद :<br>आधार क्रमांक :<br>ज्या कार्यालयातुन सेवा निवृत्त<br>झाले त्याचे नांव : | डीसीपीएस/एनपीएस/भ.नि.नि.क्र :<br>जन्म दिनांक : रक्त गट :<br>सेवेत रुजु दिनांक :<br>से.नि. दिनांक :<br>भ्रमणध्वनी क्रमांक :<br>कायमचा पत्ता : |
| कुलसचिव कर्मचारी स्वाक्षरी | सदर ओळखपत्र सापडल्यास ते कुलसचिव कार्यालयात परत करावे |

प्रतः- प्रभारी अधिकारी, मध्यवर्ति संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देउन सुचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक व संलग्न ओळखपत्राचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावा.